REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 9 | JUNE - 2018

# हातमाग व्यवसाय आणि समस्या



प्रा. डॉ. वर्षा गंगणे
एम.बी. पटेल कला–वाणिज्य–विज्ञान महाविद्यालय
देवरी, जिलगा गोंदिया.

भारत हा कलेचा प्रांत म्हणून जगाला परिचित असलेला देश आहे. अनेक प्रकारच्या हस्तकला विणकाम आणि कलाकुसरींच्या वस्तूंमुळे जगाला सर्वपरिचित आहे. विविध कलांमधील एक अतिप्रसिध्द कला म्हणजे विणकाम आणि विणकरांनी तयार केलेले वस्त्र अनेक हातांना काम मिळवून देण्याची रोजगार देण्याची क्षमता असल्यामुळे अगदी कालपर्यंत हे उद्योग भारतीय अर्थव्यवस्थेचा एक मोठा भाग होते. काश्मिरचे गालीचे, ढाक्याची मलमल, हिमालयामधिल श्रीनगरच्या शाली, कलकत्त्याच्या सुती साड्या, चरख्यावरील खादी, महाराष्ट्रातील कोसा, रेशीम आणि पैठण्या, राजस्थानची चुनरी आणि दक्षिणेतील सिलक अशी ओळख असणारा हातमाग व्यवसाय त्या–त्या क्षेत्रात प्रसिध्दिच्या सर्वोच्च पातळीवर होता. कलेच्या प्रांतातील या क्षेत्रांची मक्तेदारी सर्वपरिचीत होती.

हातमाग व्यवसायाच्या प्राथमिक अवस्थेत घरोघरी हातमाग (मांगटे) होते व त्यावर वस्त्र विणले जात होते. सुत कातणे ते रंगविणे तसेच साड्या, नऊवार टॉवेल, चादरी, लुंग्या घराघरात तयार केल्या जात असत. एक मोठा कुटीर उद्योग त्याकाळी विणकामाच्या स्वरूपात विकसीत होतो. त्यामुळे हातात आर्थिक उत्पन्न येण्याचे ते एक चांगले साधन मानले जात असे. विणकरांची वस्ती या नावाने गावातील एक विशिष्ट भाग ओळखला जात असे. राजाश्रय, लोकांची आवड कला जोपासण्याची चातुर्य, फॅशन व लोकप्रियता इत्यादिमुळे विणकाम व्यवसायाला सुगीचे दिवस होते. एकापेक्षा अधिक हातमाग असणारे कुटुंब सधन समजले जात होते. त्यामुळे घरातील स्त्रिया व तरूणांच्या हातांना आपोआप काम मिळत असे. हे परंपरागत व्यवसाय असल्यामुळे विशेष प्रशिक्षणाची गरज राहत नव्हती.

काळ बदलला तरी हातमाग व्यवसायाल घरघर लागली. लोकांच्या आवडीनिवडी बदलल्या, फॅशन व कलेचा प्रांत बदलला आणि विणकरांवर बेरोजगारीची वेळ आली. स्त्रिया आणि विणकाम यांचा जवळचा संबंध आहे. कुसरीची नाजूक कामे करण्यात स्त्रियांचा पूर्वीपासूनच हातखंडा असल्यामुळे स्त्रियांच्या अर्थाजनाचे देखील ते एक चांगले साधन होते.

वर्तमानकाळात बेरोजगारीची समस्या सोडविण्यासाठी कौशल्य विकास योजनेत हातमाग व्यवसायाचा समावेश करण्यावर विचरा करण्यात येत आहे.

## हातमाग व्यवसायाचा इतिहास :

भारतात हातमागाचा शोध इ.स. पूर्व 1500 या काळात लागला. इ.स. 12 व्या शतकापर्यंत भारताचे जागतिक वस्त्रोद्योगावर स्वामित्व होते. हातमाग व्यवसाय हा भारताच्या औद्योगिक क्षेत्रातील मोठ्या क्रांतीचा श्रीगणेशा होता. भारताने जगाला दिलेली ही एक मोठी देणगी होती. 18 व्या शतकापर्यंत या उद्योगात भारताला कोणीही स्पर्धक नव्हता. मानवी इतिहासातील एक महत्वाचा टप्पा आणि सुवर्णकाळ या शब्दात या व्यवसायाचे वर्णन केले जाते.

ऑस्ट्रेलिया, रशिया आणि ऑस्ट्रीया या देशात इ.स. पूर्व 10,000 या काळात विणलेल्या वस्त्रांचे काही अवशेष सापडले. भारतात सिंधू संस्कृतीत हडप्पा व लोथल येथे रंगवलेल्या सुती वस्त्रांचे अवशेष सापडले. कापसापासून वस्त्र बनविण्याची कला इ.स. पूर्व 10–12 हजार वर्षांपूर्वीपासून असल्याचे पुरावे सापडतात. ऋग्वेदातही लोकरीवस्त्रांचे उल्लेख सापडतात. आदिम अवस्थेत मानव गवत, झाडांच्या साली, तंतू, कापूस यांचा वापर वस्त्रांच्या स्वरूपात करीत असे. हळूहळू हातमागाचा शोध लागला व त्यावर वस्त्र विणले जाऊ लागले.

ऋग्वेदात मानवी दैवची तुलना विणकरांच्या विणण्याशी केली आहे. जीला सामान्य भाषेत सटवाई असे म्हणतात. दोन भिन्न रूप धारिणी युवती स्वरूप नियती सहा खुंट्याच्या मागावर पुन्हा–पुन्ह वस्त्र विणतात. त्यापैकी एक धागे काढते व दुसरी जोडते. त्याचे हे कार्य अविश्रांतपणे सुरू असते. (ऋग्वेद : 10–07–42). थोडक्यात स्त्रिया आणि विणकाम यांचा संबंध फार प्राचीन आहे असे म्हणावे लागेल. पूर्वी संपूर्ण जगात केवळ स्त्रियाच वस्त्र विणत असत त्यांना वायित्री, वासोवाय अथवा सीरी म्हणत. मराठीत विणकर स्त्रियांना सुगरण, बया, गवळण, हिंदित सोनाचिडी, जुलाहा तर संस्कृतमध्ये सगृहकर्ता असे म्हणतात. थोडक्यात आद्या विणकर स्त्रियाच होत्या.

कापूस पिंजणे, कातणे उभी रचना, आडवी रचना (ताणे–बाणे) कौशल्याने गुंफणे हे काम स्त्रियाच करीत असत. हातमागाचा शोध लागला तेव्हापासून स्त्रिया सुत कातण्याचे तर पुरूष विणण्याचे काम करू लागले. इ.स. पूर्व 3200 पासून भारतय सूती वस्त्र संपूर्ण जगात जाऊन पोहचले. त्याकाळी भारतीय मलमलीसाठी रोमचे लोक इतके दिवाणे होते की, त्यांचा संपूर्ण पैसा या वस्त्रांवर खर्च होत असे.

भारतात पहिला इंजिनिअरींग उद्योग म्हणून हातमाग उद्योग विकसीत झाला. तीन शतकांपूर्वी राणी अहिल्याबाई होळकर यांनी महाराष्ट्रतील काही विणकर नर्मदेच्या तटावरील माहेश्वर येथील महालात नेले व तेथे विणकरांची कला विकसीत झाली. पण कालांतराने हे वैभव इंदोरला गेले आणि माहेश्वरचा महल हॉटेलमध्ये रूपांतरीत झाला अहिल्यादेवींच्या प्रयत्नामुळे अनेक विणकरांची कला विकसीत झाली पण कालांतराने हे वैभव इंदौरला गेले आणि माहेश्वरच महल हॉटेलमध्ये रूपांतरीत झाला. अहिल्यादेवींच्या प्रयत्नांमुळे अनेक विणकरांच्या हातांना काम मिळाले. होळकरांच्या वंशजांना रेवा नावाची सोसायटी स्थापन केली. केंद्राकडून या सोसायटीला थोडाफार मदत मिळवे. 1979 साली रेवाचे काम सुरू झाले. चंद्राबाई नामक महिलेने ते नेटाने व जिकरीने चालविले. त्यांच्या बहिणीदेखील या व्यवसायात अजूनही आहेत.

दुसऱ्या शतकात हातमाग व्यवसाय सरकारच्या हातात गेला. त्यांनी या उद्योगासाठी एक अधिकारी नेमला. त्याला सुत्राध्यक्ष म्हणत. अत्यंत मानाचा व कलेचा प्रांत असणाऱ्या हातमाग व्यवसायास उतरती कळा लागली. स्त्रियांना या उद्योगात असणारा सन्मान कमी होत गेला. या उद्योगात वेणबिगारी पध्दत सुरू झाली. सुत कातायचे कम त्या काळातील विधवा, दंड देण्यास अपात्र असणारे जोगिणी, देवदासी, वारांगना यांच्याकडून करवून घेतली जाऊ लागली. इ.स. 200 ते 500 या काळात विणकरांच्या स्वातंत्र्यावर गदा आली. थोडक्यात औद्योगिक क्रांती झाली आणि विणकर आणि त्यांचे काम भूईसपाट झाले.

वर्तमानकाळात हातमाग व्यवसायात स्त्री पुरूषांचा समान सहभाग दिसून येतो. हातमागाचे नविनीकरण व विद्युत यंत्रणा विकसीत झाल्यामुळे अवघड काम सोपे झाले. विणकरांच्या संघटना स्थापित झाल्या. इतर राज्यांप्रमाणे महाराष्ट्रात तिडके समितीच्या शिफारसींच्या आधारे महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळाची स्थापना करण्यात आली. यानंतर किर्लोस्कर समितीच्या शिफारसीनुसार कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आली आणि महामंडळ सुरू झाले. 1982 पर्यंत हे महामंडळ उत्कृष्टपणे कार्यरत होते. त्यावेळी 14,000 विणकर कार्डधारक व पंजीकृत होते. राज्य सरकारने आवाडे समिती स्थापित केली. या समितीच्या शिफारसीने गुजरात सरकारने साड्यांवरील सबसिडी हटविली. विणकरांनी यांचा कडाडून विरोध केला. त्यामुळे हातमाग महामंडळ हिटलरशाहीवर उतरले. या घटनेनंतर प्रत्येक राज्यातील विणकरांच्या प्रश्नांची संख्या वाढत गेली.

हातमाग क्षेत्रात स्त्रियांच्या हातांना काम मिळत असल्यान त्या बऱ्याच प्रमाणात स्वावलंबी आर्थिकदृष्ट्याा स्वावलंबी होत्या. त्यांच्या कौशल्याला व कल्पकतेला मोठे कार्यक्षेत्र उपलब्ध होते. एखादे गाव वा शहरातील प्रभाग विणकरांच्या नावाने ओळखले जात असे, पण आधुनिकीकरण व औद्योगिकीकरणाच्या यंत्रयुगात हातमाग व्यवसायाला घरघर लागली. अनेक अडचणी व समस्यांमुळे हे उद्योग हळूहळू मागे पडले तर काही क्षेत्रात ते नामशेष झाले.

## हातमाग व्यवसायातील समस्या :

हातमाग व्यवसाय कालबाह्या होत असण्याची अनेक कारणे आहेत त्यापैकी काही ठळक कारणांचा अर्थात हातमाग व्यवसायातील काही प्रमुख समस्यांचा विचार खलील मुद्द्यांद्वारे करता येईल.

**(1) यांत्रिकीकरण –** विजेवर चालणारी यंत्रे या उद्योगात आल्यानंतर हातमागाची खटखट बंद झाली. कमी वेळात अधिक काम करकू लागल्यामुळे हाताने वस्त्र विणण्यास अधिक वेळ लागू लागला. हाताने वस्त्रा विणणारे अनेक कामगार यंत्रावर काम करू लागले. यांत्रिकीकरणाचा मोठा फटका या व्यवसायांना बसला. मशिनीकरणामुळे हातमागाच्या ठिकाणी पावरलूम आणि आता पावरलूमच्या जागी हायटेक मशिन्स आल्या आहेत.

**(2) कच्चा मालाची समस्या –** हातमाग व्यवसायाला लागणारा धागा, रंग, कातणे यासारख्या कच्च्या मालाच्या स्वरूपातील वस्तूंचा तुटवडा जाणवू लागला. अनेक वर्षांपासून सुत पुरवठा झाला नाही. त्यामुळे हा व्यवसाय संकटात आला.

**(3) अल्प मोबदला –** हातमाग व्यवसायात मेहनत अधिक तर मोबदला अत्यंत कमी आहे. 2 नववार लुगडे (पातळ) तयार केल्यावर फक्त 300 रू. मजूरी मिळते. (1 दिवसात 2 साड्याा आणि एक 6 वार साडी तयार केल्यास 75 रू. मोबदला मिळतो.) त्यामुळे हा व्यवसाय महागाईच्या काळात परवडेनासा झाला.

**(4) फॅशन व आवडीतील बदल –** फॅशन बदलल्याने नऊवार नेसण्याचे व मागणी करण्याचे प्रमाण घटले त्यामुळे विणकरांवर संकट आले. अनेक पर्यायी वस्त्र फॅशननुसार उपलब्ध असल्यामुळे टेरिकॉट, नायलॉनच्या युगात सुती व रेशमी वस्त्र मार्गे पडले त्यामुळे विणकरांचा पारंपारिक व्यवसाय आता आता मागे पडला आहे.

**(5) तरूणाईचा अनिच्छा –** अनेक समस्या व कमी मोबदला यामुळे तरूण–तरूणी या व्यवसायात काम करण्यास इच्छूक नाहीत त्यामुळे या व्यवसायाची प्रगती होणे हा आता काल्पनिक मुद्दा झाला आहे. एकेकाळी ज्या घरात 50 हातमाग होते तेथे आता 4 आहेत. काही जेष्ठ वृध्द काही पैश्यांसाठी हे कार्य करीत आहेतत्र

**(6) राजाश्रयाचा अभाव –** पूर्वी कलेला जीवंत ठेवणारी राजेशाही पध्दत होती. त्यामुळे कलेला अभय मिळत असे. भारतातील विणकाम देश–विदेशात देखील प्रसिध्द होते. पण राजेशाही संपल्यानंतर शासन काळात या उद्योगांवर संकट आले.

**(7) बाजारपेठांचा अभाव –** हातमाग वस्त्रांना स्वतंत्र बाजारपेठा उपलब्ध नाहीत. त्यामुळे या व्यवसायाचा व त्यातील वस्तूचा परिचय जाहिरपणे ग्राहकांना होत नाही. काही बोटांवर मोजक्याइतके ग्राहक या वस्तूंना मागणी करतात. त्यामुळे हातमाग व्यवसाय संकटात सापडले आहेत.

**(8) जागतिकीकरण व स्पर्धा –** जागतिकीकरणांमुळे जग जवळ आले पण स्पर्ध मोठ्याप्रमाणात वाढली. या स्पर्धेत लहान–लहान उद्योग टिकून राहणे कठीण झाले. त्याची झळ हातमाग व्यवसायाला देखील बसली. स्पर्धेमुळे अनेक प्रकारचे वस्त्र विविध चर्चा यांच्या स्वरूपात बाजारात आले. जे हातमागावरील वस्त्रांचा तुलनेत स्वस्त व आकर्षक होते.

(9) हाताने तयार करण्यात आलेल्या वस्त्रात कलाकुसर व मेहनत अधिक असल्यामुळे तसेच वेळ अधिक लागत असल्याने त्यांच्या किंमतीदेखील अधिक असतात. पैठणची पैठणी, इचलकरंजीचे वस्त्र, माहेश्वरची माहेश्वरी, बालुचेरी, सिल्क, कोसा यासारख्या साड्यांना अधिक किंमत मोजावी लागते. सामान्य ग्राहक एवढी किंमत देण्यास सहसा तयार होत नाही त्यामुळे मागणी कमी होते.

**(10) शासनाचे दुर्लक्ष –** आपल्या देशातील हस्तकला व हातमाग व्यवसाय जिवंत ठेवण्यासाठी मधल्या काळात शसनाने विशेष प्रयत्न केले नाहीत. अनेक मंडळे बरखास्त करण्यात आली. हातमाग मंडळांचे अनुदान बंद करण्यात आले. त्यामुळे हातमाग व्यवसायिकांची आर्थिक कोंडी झाली.

**(11) नोटाबंदी –** नोटांदीचा या व्यवसायांना मोठा फटका बसला. 40 टक्के कारखन्यांना नोटाबंदीमुळे कुलुप लागला. छोट्याा पैश्याच्या अभावामुळे व्यवहार ठप्प झाले. नोटाबंदीपूर्ती एकट्याा ठाणे जिल्ह्यातील भिवंडी येथे देशातील 1/3 पॉवरलूम काम करीत होते यापैकी 40 टक्के बंद झाले. 6 लाख 50 हजार पावरलूम सध्या कार्यरत असून 8 हजार शटललेस ऑटोमॅटिक पावरलूम कार्यरत आहेत. देशात हे प्रमाण 24,85,000 इतके असून महाराष्ट्रात 12 लाख 3,500 इतके आहे.

वरील सर्व समस्यांशिवाय लोकांच्या आवडी–निवडीतील बदल, जाहिरातींचा अभाव, फॅशनमधिल बदल, कला जोपासण्याचा अभाव, प्रशिक्षण व नविन तंत्रज्ञानांचा अभाव, संस्कृती जोपासण्याच्या इच्छेचा अभाव यासारख्या अनेमक कारणांमुळे हातमाग व्यवसायाची भरभराट व वैभव काळाबरोबर लय पावत चालले आहे. स्त्रियांच्या हातांना मिळणारे कामदेखील कमी झाले आहे. परिणामी घरच्याघरी मिळणारे उत्पन्नाचे स्रोत बंद होत चालले आहेत. त्याचा एकूण परिणाम म्हणजे ग्रामीण क्षेत्रातील आर्थिक उत्पन्नाचा वाटा घटला आहे. हातमाग व्यवसायाला लागलेली घरघर किंवा उतरती कळा म्हणजे ग्रामीण व कुटीर क्षेत्रातील व्यवसायांचा पर्यायाने हस्तकला, कौशल्य व आर्थिक स्वावलंबनाचा लोप होय.

हातमाग व्यवसायात देशातील 9 कोटी कुशल व अकुशल कामगार व विणकर कार्यरत आहेत असे एका अहवालात नमूद करण्यात आले आहे. अनेक राज्यातील श्रमिक इतर राज्यात काम करतात. 6 लाख 60 हजार पावरलूम कारखाने इचलकरंजी, धुळे, सोलापूर, नाशिक, येवला, नागपूर, यवतमाळ, आंध्रप्रदेश, तेलंगाणा, पश्चिम बंगालचे मजूर काम करतात. एकट्याा भिवंडीत पावरलूमशिवाय 107 साईजिंग यूनिट, रंगकामासाठी 65 आणि यार्न रंगकामासाठी 100 कारखाने संचालित आहेत.

पावरलूम कापड व्यवसायांसाठी 60 टक्के यार्न (सूत) दक्षिण भारतातील आंध्रप्रदेश, तामिळनाडू, केरळ आणि 40 टक्के महराष्ट्र, गुजरात व दिव–दमण येथून येतो. भिवंडीसाठी राजस्थानमधील पाली व वालोतरा, गुजरीतच्या अहमदाबाद, सुरत, उत्तर प्रदेशच्या कानपूर, गाझियाबाद, मेरठ, दिल्ली व कलकत्ता येथून कच्चा माल येतो. भिवंडीत तयार होणारे 14 टक्के कापड विदेशात पाठविले जाते.

सोलापूर शहरात एकूण 25 टक्के मजूर कापड उद्योगात काम करतात. टॉवेल, चादरी, आसने, गालीचे इ. तयार करण्यासाठी एकूण 35,000 श्रमिक कार्यरत आहेत. या व्यवसायाचा टर्नओव्हर 1500 कोटी रू. इतका आहे. विदेशात देखील ब्रांडच्या नावाने माल पाठविला जातो.

## निष्कर्ष :

(1) हातमाग व्यवसाय हे एकेकाळचे भारताचे वैभव होते ते आता नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.
(2) परंपरागत पध्दतीने चालणारे हे उद्योग कला व कौशल्याची ओळख होते. आता ही कला हरवत चालली आहे.
(3) हातमाग व्यवसायात स्त्रिया मोठ्या संख्येने कार्यरत होत्या. त्यांना आता काम मिळेनासे झाले आहे.
(4) हातमाग व्यवसाय मागे पडल्यामुळे ग्रामीण क्षेत्रातील अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणात झाला आहे.
(5) शासन व रसिक ग्राहकांचे व व्यवसायाकडे दुर्लक्ष झाले आहे.
(6) हातमागावर काम करणे स्त्रियांसाठी आवडीचे, सहज, सुरक्षित व सुलभ होते. ज्यातून त्या अर्थार्जन करू शकतात.
(7) नोटाबंदीचा हातमागाला मोठा फटका बसला आहे. पूर्वी अर्धा देश या व्यवसायासाठी बाजार होता आता यात मोठी घट झाल्याची दिसून येते.
(8) जीएसटीचा हातमाग व्यवसायाला फटका बसला आहे. लहान जीएसटीमुळे कच्चा माल 30 ते 40 रू. प्रति किलो महागण्याचे दिसून येते.

## शिफारस :

(1) हातमाग व्यवसायांचा कौशल्य विकास योजनेत समावेश करण्यात यावा.
(2) शासनाने हातमाग व्यवसायांना जिवंत ठेवण्यासाठी संबंधित मंडळांना अनुदान द्यावे.
(3) स्त्रियांना या व्यवसायात कामाच्या अनेक संधी असल्यामुळे सक्षमीकरण धोरणात यावर विचार करण्यात यावा.
(4) या उद्योगांना लागणारा कच्चा माल जीएसटीतून वगळण्यात यावा.
(5) हातमाग व्यवसायिकांना प्रशिक्षण व आर्थिक मदतीची तरतूद केली जावी.
(6) जुन्या विणकरांकडून नविन पिढीलाही कला शिकविली जावी यासाठी त्यांना मानधन दिले जावे.
(7) शसानाने या उद्येगांना आश्रय देत बाजारपेठा उपलब्ध करून द्याव्या.
(8) ग्रामीण अर्थव्यवस्था सुदृढ करण्यासाठी हातमाग व्यावसायिकांना प्रोत्साहन दिले जावे. त्यासाठी सुलभ कर्ज योजना, विमा योजना, खरेदीची हमी इत्यादी प्रयत्न केले जावेत.
(9) संस्कृती व कलेची कदर केली जावी त्यासाठी सर्वच पातळ्यांवरून जाहिरात केली जावी व संदेश दिले जावेत.
(10) बंद पडलेले किंवा आजारी हातमाग व्यवसाय पुन्हा सुरू करण्यासाठी नियोजन केले जावे.
(11) गावांमधील तरूणाईला (अर्धशिक्षित, बेरोजगार) या व्यवसायांकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न केला जावा.

## सारांश :

हातमाग व्यवसाय हे हस्तकलेतील मुख्य वैभव आहे. अनेक प्रांताच्या कलांचा प्रत्यय यातून येतो. या व्यवसायात शेतीखालोखल अनेक हातांना काम देण्याची क्षमता आहे. स्वदेशी, स्वावलंबन, आर्थिक निर्भरतेसाठी या व्यवसायात भरपूर वाव आहे. ग्रामीण व शहरी विषमता संपुष्टात आणण्यासाठी हे उद्योग जिवंत राहणे तसेच विकसीत होणे गरजेचे आहे. सद्यास्थितीत पंतप्रधन कौशल्य विकास योजना, पं. दिनदयाल कौशल्य विकास योजना, प्रमोद महाजन कौशल्य योजना, यासारख्या विविध योजना बेकारांना काम मिळवून देण्यासाठी राबविण्यात येत आहेत. यात मुली, स्त्रिया तसेच अनुसूचित जमातीच्या बेरोजगारांना प्रशिक्षण दिले जात आहे.

## संदर्भसूची :


- लोकराज्य – सप्टेंबर 2017
- कुरूक्षेत्र – ऑक्टोबर 2017
- लोकमत–लोकसत्ता – वृत्तपत्र.